आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१५ एप्रिल २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- तंत्रज्ञानातल्या प्रगतीमुळे ग्रामीण आणि शहरी भागातल्या आरोग्य व्यवस्थेतली दरी संपुष्टात आणण्याची गरज राष्ट्रपतींकडून व्यक्त

- भाजपा नेते सम्राट चौधरी यांनी घेतली बिहारच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ

- अमरावतीमधल्या अल्पवयीन मुलींच्या छळ प्रकरणाची चौकशी करण्यासाठी SIT ची स्थापना

**आणि**

- मुंबईसह संपूर्ण कोकण, विदर्भ आणि मराठवाड्यातल्या काही भागात २ दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा

**<><><><><>**

तंत्रज्ञानातल्या प्रगतीमुळे ग्रामीण आणि शहरी भागातल्या आरोग्य व्यवस्थेतली दरी संपुष्टात यायला हवी अशी अपेक्षा राष्ट्रपती द्रौपदी  मुर्मू यांनी व्यक्त केली. त्या अनुषंगानं नागपूर एम्स काम करत आहे, असं त्या म्हणाल्या. नागपूरच्या एम्स अर्थात अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या दुसऱ्या दीक्षान्त समारंभात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. देशातल्या पायाभूत  सुविधांचा विकास करण्यासाठी केंद्र सरकारनं गेल्या दहा वर्षांत अनेक उपाययोजना आखल्या आहेत, असं राष्ट्रपती म्हणाल्या. यावेळी त्यांनी आयुष्मान भारत जन आरोग्य योजने अंतर्गत दिल्या जाणाऱ्या सुविधांचाही उल्लेख केला.

**-   - होल्ड बाईट राष्ट्रपती - - -**

यावेळी राष्ट्रपतींनी आठ विद्यार्थ्यांना सुवर्ण पदकं प्रदान केली. यावेळी राज्यपाल जिष्णूदेव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस उपस्थित होते.

राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी इथं भारतीय महसूल सेवेच्या ७८ व्या तुकडीच्या प्रशिक्षण समापन समारंभातही राष्ट्रपतींची प्रमुख उपस्थिती असेल.

**<><><><><>**

जलसंवर्धन, नैसर्गिक शेती ते तंदुरूस्ती आणि सेवा अशा नऊ क्षेत्रांच्या विकासासाठी नागरिकांनी समर्पण भावनेतून प्रामाणिकपणे काम करावं म्हणजे विकसित भारत ही संकल्पना सत्यात उतरेल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज म्हणाले. कर्नाटकच्या मांड्या जिल्ह्यात नागमंगला इथं आदिचुनचनगिरी महासंस्थान मठातल्या मंदिराचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. या नऊ क्षेत्रात निष्ठेनं काम करण्याची प्रतीज्ञा घेण्याचं आवाहनही त्यांनी उपस्थितांना केलं.

अधिक चांगलं जलव्यवस्थापन, एक पेड मा के नाम या योजनेअंतर्गत वृक्षारोपण, सार्वजनिक आणि धार्मिक ठिकाणी स्वच्छता, स्थानिक उत्पादनांना चालना, कमी तेल वापरून केलेलं सकस अन्न खाणं या मुद्द्यावर त्यांनी भर दिला. गरीब आणि मागासवर्गीयांसाठी सेवा भावनेनं काम करा, असंही त्यांनी सांगितलं.

त्यांनी यावेळी दोन पुस्तकांचं प्रकाशनही केलं.

**<><><><><>**

महिला आरक्षण विधेयक समतोल असून प्रत्येक राज्याच्या, समुदायाच्या आणि प्रदेशाच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी समर्थ असल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटलं आहे. नारी शक्ती वंदन अधिनियम विधेयकातल्या दुरुस्त्यांवर चर्चा करण्यासाठी आणि पारित करण्यासाठी उद्यापासून संसदेचं विशेष अधिवेशन सुरु होणार असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं.

या विधेयकामुळे महिलांना लोकसभा आणि विधानसभांमध्ये तेहतीस टक्के आरक्षण लागू होणार आहे. लोकसभेत हे विधेयक उद्या मांडलं जाईल, त्यावर अठरा तास चर्चा अपेक्षित आहे, तर राज्यसभेत दहा तासांची चर्चा ठेवण्यात आल्याचं रिजिजू यांनी सांगितलं.

दरम्यान, माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनीही राज्यातल्या खासदारांना पत्र लिहून या सुधारणांना पाठिंबा देण्याची विनंती केली आहे.

**<><><><><>**

भाजपा नेते सम्राट चौधरी यांनी आज बिहारच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. बिहारचे ते २४ वे मुख्यमंत्री आहेत. भाजपाच्या नेतृत्त्वाखाली पहिल्यांदाच बिहारमध्ये सरकार

स्थापन झालं आहे. राज्यपाल निवृत्त लेफ्टनंट जनरल सय्यद अता हसनैन यांनी पाटण्यातल्या लोकभवनात त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. संयुक्त जनता दलाचे विजय कुमार चौधरी आणि बिजेंद्र प्रसाद यांनी यावेळी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. संयुक्त जनता दलाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री नितीश कुमार, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन, केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह विविध मान्यवरांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात आदित्य ठाकरे यांना कार्याध्यक्ष पद दिलं जाणार अशी चर्चा प्रसार माध्यमांमध्ये सुरू होती. मात्र यात चर्चांमध्ये काहीही तथ्य नसल्याचं आदित्य ठाकरे यांनी समाजमाध्यमांवर स्पष्ट केलं आहे.

<><><><>

अमरावतीमधल्या अल्पवयीन मुलींच्या लैंगिक छळ प्रकरणाची चौकशी करण्यासाठी पोलिसांनी SIT अर्थात विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. १० पोलिस अधिकारी आणि ३६ कर्मचारी अचलपूरच्या सहाय्यक पोलीस अधीक्षकांच्या नेतृत्त्वाखाली या प्रकरणाची चौकशी करणार आहेत.

परतवाडा भागात हा प्रकार घडला. याप्रकरणी पोलिसांनी मोहम्मद अयाझ याच्यासह एकूण ४ जणांना अटक केली आहे. त्यांनी सुमारे १८० अल्पवयीन मुलींना प्रेमाच्या जाळ्यात फसवून त्यांचे अश्लील व्हिडीओ काढले. त्यानंतर या व्हिडीओच्या आधारे त्यांना ब्लॅकमेल केलं आणि वेश्याव्यवसायात ढकललं असा आरोप आहे. अचलपूर नगरपरिषदेनं आरोपीच्या घराचं अवैध बांधकाम तोडलं आहे. या घटनेच्या निषेधार्थ आज अचलपूर-परतवाडा शहरातली बाजारपेठ पूर्णतः बंद ठेवण्याचा निर्णय विविध सामाजिक संघटनांनी घेतला आहे. त्याला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला.

<><><><>

तातडीनं सुटका व्हावी अशी मागणी करणारी कुख्यात गुंड अबू सालेमची याचिका आज मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळली. पोर्तुगालमधून प्रत्यार्पण करताना दिलेल्या अटींनुसार भारतात २५ वर्षांचा तुरुंगवास पूर्ण झाल्याचा दावा सालेमनं आपल्या अर्जात केला होता. तर

सालेमनं आतापर्यंत केवळ १९ वर्ष तुरुंगात घालवली असून त्याच्या मुदतपूर्व सुटकेचा कोणताही निर्णय अद्याप झालेला नाही, असं सरकारनं या याचिकेला विरोध करताना सांगितलं. चांगल्या वर्तणुकीमुळे मिळणारी सवलत गृहीत धरली, तर आपली २५ वर्षांची शिक्षा पूर्ण झाली आहे, असा सालेमचा युक्तिवाद न्यायमूर्ती ए. एस. गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खता यांच्या पीठाने अमान्य केला.

<><><><><>

अकोला शहरात अगर वेस भागात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. हा मृत्यू उष्माघातानं झाल्याचा संशय आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचं नेमकं कारण स्पष्ट होणार आहे, असं पोलिसांनी सांगितलं.

<><><><><>

भंडारा जिल्ह्याच्या साकोली तालुक्यातल्या वीरशी इथं झोपेत असलेल्या एका ५ वर्षाच्या मुलावर हल्ला करत आज एका वाघिणीनं त्याला ठार केलं. गेल्या महिनाभरात या वाघिणीनं अशा प्रकारचे ४ हल्ले केले असून त्यात तिघे जण ठार तर एक जण जखमी झाला आहे.

<><><><><>

भारतीय हवामान विभागानं राज्यातल्या काही जिल्ह्यांना तुरळक ठिकाणी आज आणि उद्या उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला असून काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी तापमानवाढीचा 'यलो अलर्ट' जारी केला आहे. कोकणात पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये आज आणि उद्या तुरळक ठिकाणी उष्णतेचा 'यलो अलर्ट' आहे. तसंच सांगली, सोलापूर या पश्चिम महाराष्ट्रातल्या दोन जिल्ह्यात तर विदर्भातल्या अकोला जिल्ह्यातही तुरळक ठिकाणी आज आणि उद्या तर मराठवाडा आणि विदर्भात छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, अमरावती आणि वर्धा या जिल्ह्यांना तुरळक ठिकाणी उद्या उष्णतेच्या लाटेची दाट शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

//<><><><><>//